# आढावा मेट्रो कामांच्या प्रगतीचा

**वाहतूक सुधारण्याकरिता मुंबई व परिसरातल्या मेट्रोची कामं वेळेवर पूर्ण होणं फार जरूरी आहे. पण ती कामं कोरोनाच्या काळात मंदावली आणि इतरही काही कारणांमुळे संथपणे सुरू आहेत. त्यांची कितपत प्रगती झाली आहे ते आपण जाणून घेऊ या.**





रस्त्यावरची वाहतूक सुधारण्यासाठी सध्या जगात सर्वत्र खाजगी वाहनांपेक्षा सार्वजनिक वाहतुकीला प्राधान्य दिलं जात आहे. पण आपल्याकडे मात्र कोस्टल रोडसारखे प्रकल्प राबवून खासगी वाहनांना प्रोत्साहन देण्यात येतं. परंतु हे लक्षात घ्यायला हवं की, खासगी वाहनांची बेसुमार वाढ झाल्यावर वाहतूककोंडी आणखी वाढेल.

मेट्रोसारख्या पर्यायांमुळे वाहतूक कोंडीची समस्या कमी होईल. इलेक्ट्रिक इंधनामुळे वायू प्रदूषण कमी होईल. रेल्वेची गर्दी कमी झाल्यामुळे रेल्वेच्या सेवेत सुधारणा होईल. मेट्रो आपल्या घरापासून अर्धा ते एक किमीवर अंतरावर असल्यामुळे प्रवाशांसाठी ती सोयीची ठरेल, यात शंका नाही. सध्या मुंबईत चार मेट्रो मार्ग सुरू आहेत.

मोनोरेलची सेवा तोट्यात गेल्यात जमा आहे. सध्या ती सात गाड्यांवर अवलंबून आहे. चेंबूर ते गाडगे महाराज चौक या २० कि.मी.च्या पट्ट्यात असलेल्या १८ स्टेशन्सदरम्यान ती सुरू आहे. एमएमआरडीए ५९० कोटी रुपये खर्चून जानेवारी २०२४ पर्यंत आणखी १० गाड्या विकत घेणार आहे. मोनो उभारणीसाठी आत्तापर्यंत ३०२५ कोटी रुपये खर्च झाले आहेत. संचालन करणारी स्कोमी संस्था २०१८ मध्ये गोत्यात गेल्यामुळे सर्व कारभार एमएमआरडीएकडे देण्यात आला आहे. मोनोची अपेक्षित प्रवासी संख्या दिवसाला दीड ते दोन लाख आहे पण त्याकरिता संचालकांनी मोनोची काही कामं पूर्ण करायला हवीत. मेट्रो ३ पर्यंत व महालक्ष्मी स्टेशनपर्यंत तिचा विस्तार करण्याचा विचार करायला हवा.

## मेट्रो मार्ग १ – वर्सोवा ते घाटकोपर

ही मेट्रो रोज सुमारे ५ लाख प्रवाशांना सेवा पुरवत आहे. हा मार्ग सुरू होऊन आठ वर्षं झाली व सुमारे ७२ कोटी मुंबईकरांनी आत्तापर्यंत या सेवेचा लाभ घेतला आहे. आता या मार्गावरच्या मेट्रो रात्री उशीरापर्यंत धावणार आहे. ही देशातील पहिली अशी मेट्रो आहे, जिने नोव्हेंबर २०१७ पासून व्हॉटसॲपवर मोबाइल तिकीटं देण्यास सुरुवात केली.

## मेट्रो मार्ग २ अ व ७

या मार्गाचा पहिला टप्पा म्हणजेच अनुक्रमे आनंद नगर ते धनकरवाडी आणि दहिसर पूर्व ते आरे कॉलनी. हे मार्ग गेल्या एप्रिलपासून सुरू झाले आहेत. या मेट्रोचा दुसरा टप्पा म्हणजेच अनुक्रमे धनकरवाडी ते अंधेरी पश्चिम आणि आरे कॉलनी ते अंधेरी पूर्व सुरू होण्यास डिसेंबर २०२२ उजाडेल. या मार्गावर चाचण्या घेण्याचं काम सप्टेंबरमध्ये सुरू होणार आहे. या दोन्ही मार्गांवरचा पहिला टप्पा सुरू होऊन अंदाजे तीन महिन्यांपेक्षा अधिक काळ लोटला आहे. परंतु प्रवाशांची संख्या केवळ सरासरी २६००० इतकीच दिसत आहे. ही संख्या दुसऱ्या टप्प्यानंतर नक्की वाढेल अशी शक्यता आहे.

## मेट्रो मार्ग ७ अ- अंधेरी विमानतळ

हा मार्ग २.७ किमी लांब असून तो मेट्रो ७ चा विस्तार आहे. ७ अ मध्ये दोन स्टेशन्स असतील. एक विमानतळाजवळ भूमिगत स्टेशन असेल व दुसरं या मार्गावरचं उन्नत स्टेशन असेल. मेट्रो २ अ व ७ यादरम्यानच्या १८ स्टेशन्सच्या बाहेर सायकल प्रवासाची सोय करण्यात येणार आहे.

## मेट्रो मार्ग २ ब- डीएन नगर ते मंडाले

**स्थूल किंमत**- १०९८६ कोटी रु.
**लांबी**- २३.६ किमी; उन्नत स्वरूपात
**कधी सुरू होणार**- २०२४ (अंदाजित)

## मेट्रो मार्ग ३– कुलाबा-वांद्रे-सीप्झ

स्थूल खर्च २३१३६ कोटी रुपये होता परंतु यात पुढे ३३४०५ कोटी



रुपयांची वाढ म्हणजेच ४४ टक्के वाढ झाली. जमीन खणण्याचं काम सुरू झाल्यावर कठीण दगड लागले तसंच ट्रॅफिक करिता तात्पुरते स्टील डेक बांधावे लागले. ही मेट्रो गाडी ८ डब्यांची असल्याने त्यासाठी जादा खर्च येणार आहे. सरकारच्या विलंबित निर्णयामुळे कारशेडचं काम लांबलं. त्यामुळेही खर्चात वाढ झाली. या मार्गाचं काम नेव्ही नगरपर्यंत विस्तारणार आहे. कफ परेड ते नेव्ही नगरपर्यंत या मार्गाची लांबी २.५ किमी असून अतिरिक्त स्थूल किंमत २५०० कोटी रु. असेल. या मार्गाच्या भुयारीकरणाचं ९९ टक्के काम पूर्ण झालं असून सध्या रूळ आणि अन्य महत्त्वाची कामं पूर्ण करण्यावर भर दिला जात आहे. याचे रूळ लो व्हायब्रेशन पद्धतीचे आहेत. गाडी रूळावरून गेल्यावर आजूबाजूला तिचे धक्के जाणवणार नाहीत. कंपनं शोषून घेण्याची क्षमता या रूळांमध्ये असेल. या मार्गावर गाडी व ट्रॅक चाचणीचं काम आता सुरू होईल कारण तात्पुरत्या कारशेडचं काम पूर्ण झालं आहे. आंध्र प्रदेशातून डबे यायला सुरुवात झाली आहे. डब्याचं वजन ४२ टन आहे. सारिपूतनगर ते मरोळ नाका या तीन किलोमीटरच्या अंतरावर या चाचण्या घेतल्या जाणार आहेत. ही गाडी स्वयंचलित, संपूर्ण वातानुकूलित व आर्द्रता नियंत्रित असेल.

मनोरंजनासाठी व जाहिरातींसाठी एलसीडी, प्रवासाच्या मार्गाचा डिजिटल नकाशा, आरामदायी आसन व्यवस्था, उभ्या प्रवाशांसाठी खांबाची व्यवस्था, सीसीटीव्ही, अद्ययावत एअर सस्पेन्शन, प्रत्येक डब्यात धूर व अग्नीशोधक यंत्रणा असणार आहे. आपत्कालासाठी वा अन्य कामासाठी प्रवासी व ट्रेन नियंत्रक यांच्यात ध्वनी संवाद यंत्रणा बसवण्यात येणार आहे. सारिपूतनगरमध्ये आठ डब्यांच्या गाडीची नुकतीच यशस्वीरित्या जोडणी झाली. या बॅटरीचलित शंटरची वजन खेचण्याची क्षमता ३५० टन आहे.

## मेट्रो मार्ग ४ व ४ अ- वडाळा ते कासारवडवली (गायमुख)

**लांबी**- ३२.३ किमी व २.७ किमी
**स्थूल किंमत**- १४५४९ कोटी रु. व ९४९ कोटी रु.

या मार्गाची ४५ टक्क्यांहून जास्त स्थापत्य कामं पूर्ण झाली आहेत. या मेट्रोचं सर्वात लांब अंतर हे ३५ कि.मी.चं असेल. ही मेट्रो २०२४ मध्ये सुरू होण्याची शक्यता आहे.

## मेट्रो मार्ग ५- ठाणे-भिवंडी-कल्याण

**लांबी**- २४.९ किमी
**स्थूल किंमत**- ८४१७ कोटी रु.

हा मार्ग २०२४ मध्ये सुरू होईल असा अंदाज आहे.

## मेट्रो मार्ग ६- समर्थ नगर ते विक्रोळी

**लांबी**- १४.५ किमी.
**स्थूल किंमत**- ६७७६ कोटी रु.

या मार्गाचं ५९ टक्के काम पूर्ण झालं आहे. या मार्गावरचं कांजूरमार्ग स्टेशन १० मजली म्हणजेच साधारण ३० मीटर उंच असणार आहे. याची सुरुवात पुढील वर्षी म्हणजेच २०२३ मध्ये होईल अशी अपेक्षा आहे.

## मेट्रो मार्ग ८- नवी मुंबई एअरपोर्ट ते मुंबई एअरपोर्ट

**स्थूल किंमत**- १५००० कोटी रु.
**लांबी**- ३५ किमी.
प्रकल्प नियोजनात आहे.

## मेट्रो मार्ग ९- दहिसर पू ते मीरा-भाईंदर

**लांबी**- १३.५ किमी,
**स्थूल किंमत**- ६६०७ कोटी रु.

हा मार्ग २०२४ मध्ये सुरू होण्याची शक्यता आहे.

## मेट्रो मार्ग १० व १२- मीरा रोड ते गायमुख व कल्याण ते तळोजा

**लांबी**- अनुक्रमे ९.२ किमी व २०.७५ किमी,
**स्थूल किंमत**- ३८३१ कोटी व रु ४७३८ कोटी रु.

सल्लागाराची नियुक्ती झाली असून प्रकल्प कामांचं नियोजन सुरू आहे.

## मेट्रो मार्ग ११- वडाळा ते जीपीओ

**लांबी**- १२.७ किमी
**स्थूल किंमत**- ८७३९ कोटी रु.
नियोजन सुरू आहे.

## मेट्रो मार्ग १३ - शिवाजी चौक ते विरार

**लांबी**- २३ किमी.
**स्थूल किंमत**- ६९०० कोटी रु.
नियोजन सुरू आहे.

## मेट्रो कामांसाठी कारशेड

मेट्रो १ साठीची कारशेड वर्सोव्याला आहे; मेट्रो २ अ व ७ साठीची कारशेड चारकोपला तर मेट्रो ३ साठीची कारशेड आरेजवळ बांधण्यास सरकारने संमती दिली आहे. परंतु कंत्राटदारांनी चाचण्या घेण्यासाठी सारिपूतनगर इथे तात्पुरती कारशेड उभी केली आहे. मेट्रो ४, १० आणि ११ या तीन प्रकल्पांसाठी घोडबंदर मार्गावरच्या मोघरपाडा इथे कारशेडसाठी भूखंड मिळाला आहे. मेट्रो ५ साठी भिवंडी तालुक्यातल्या कशेळीला भूखंड मिळाला आहे. मेट्रो ६ साठी सरकारचा विक्रोळीला कारशेड बांधण्याचा विचार आहे; मेट्रो २-ब कारशेड मानखुर्द जवळच्या मंडाले इथे होणार आहे; मेट्रो ९ साठीची कारशेड राई मुर्धा (भाईंदर) इथे होण्याची शक्यता आहे; इतर मेट्रो मार्गांच्या कारशेडसाठी जागा मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

**– अच्युत राईलकर**
(लेखक ज्येष्ठ अभियंते असून त्यांनी मुंबई महानगरपालिकेच्या जलविभागात काम केलेलं आहे.)
mtartnedit@timesgroup.com

**टाइम्स ऑफ रिअल इस्टेट**
संपादिका - रुई गावंड
संपादन साहाय्य - राजेश वाघमारे, आदित्य जोशी
डिझाइन हेड - रघुनाथ मोरे
डिझाइनिंग साहाय्य - अंकित मोर्ये
पत्ता - महाराष्ट्र टाइम्स आर्ट अँण्ड एडिट, रिस्पॉन्स दुसरा मजला, टाइम्स ऑफ इंडिया बिल्डिंग, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट, मुंबई -१.

जाहिरातीसाठी संपर्कः
Mrunal Nair
mrunal.nair@timesgroup.com